सोलापूर, बुधवार, १३ सप्टेंबर २०२३ सकाळ TODAY सोलापूर

# सायबर सुरक्षेविषयी सर्वांनी जागरूक राहावे

## प्र. कुलगुरू डॉ. कांबळे; विद्यापीठात क्विक हिल फाउंडेशनतर्फे कार्यक्रम

▸ सकाळ वृत्तसेवा

सोलापूर, ता. १२ : सर्वच क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढला असून प्रत्येकजण मोबाईलचा वापर करतात. या पार्श्वभूमीवर सायबर गुन्हेगारांकडून ऑनलाइन फसवणुकीचे प्रकार वाढत आहेत. त्यामुळे प्रत्येकांनी सायबर सुरक्षेविषयी जागरूक राहावे, असे आवाहन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू गौतम कांबळे यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील संगणकशास्त्र संकुल व क्विक हिल फाउंडेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' हा उपक्रम राबविला जातो. या उपक्रमात संकुलातील संगणकशास्त्र व एमसीए विभागातील विद्यार्थ्यांना क्विक हिल फाउंडेशनमार्फत सायबर सेक्युरिटीचे प्रशिक्षण दिले जाते. सोमवारी (ता. ११) या प्रशिक्षणाचे उद्घाटन विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. कांबळे यांच्या हस्ते झाले. यावेळी क्विक हिल फाउंडेशनच्या वरिष्ठ कार्यकारी अधिकारी सुगंधा दानी, सोलापूर शहर पोलिस आयुक्तालयातील सायबरचे पोलिस निरीक्षक श्रीशैल गजा, वसीम शेख व प्रांजली काळे यांनी यांची प्रमुख उपस्थिती होती. संकुलातील १५० विद्यार्थी, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षणाचा लाभ घेतला. याप्रसंगी प्रशा. विकास घुटे, नागेश इंगळे, मच्छिंद्र राठोड, सचिन अंबालगी, डॉ. आर.एस. मैती, डॉ. एस. डी. राऊत, डॉ. जे.डी. माशाळे, सी.जी. गार्डी, बी.डी. चेंडगे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन चरिता जवळकोटी यांनी तर आभार डॉ. अशोक शिंदे यांनी मानले.




सोलापूर : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात सायबर सुरक्षाविषयक मार्गदर्शनपर कार्यक्रमात प्र कुलगुरू डॉ. गौतम कांबळे, पोलिस अधिकारी श्रीशैल गजा, प्रा. विकास घुटे, सुगंधा दानी व अन्य.

### विद्यार्थ्यांची सायबर वॉरिअर्स म्हणून निवड

प्रशिक्षणानंतर क्विक हिल फौंडेशनकडून काही विद्यार्थ्यांची सायबर वॉरिअर्स म्हणून निवड केली. हे सायबर वॉरिअर्स जिल्ह्यातील शाळा व महाविद्यालयांना भेटी देऊन विद्यार्थ्यांमध्ये व्याख्यानाद्वारे सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करणार आहेत. या सायबर वॉरियर्सना क्विक हिल फाउंडेशनकडून विद्यावेतन दिले जाते. मागील पाच वर्षात या सायबर वॉरियर्सनी सोलापूर जिल्ह्यातील व्याख्यानाद्वारे एक लाख ५७ हजार १६५ विद्यार्थ्यांमध्ये सायबर सेक्युरिटीबद्दल जागरूकता केली आहे.